**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर**
**दिनांक १८/०२/२०२२ (शुक्रवार)**

---

## चोरी

**पोलीस स्टेशन रामटेक** – अंतर्गत राजमहल रिसोर्ट खिंडसी रोड रामटेक ८ किमी पु. यातील फिर्यादी रामटेक येथील राजमहल रिसोर्ट खिंडसी येथे लग्न समारंभात आले असता, फिर्यादीच्या पत्नीचे हॅन्डपर्स, ज्यामध्ये १) सोन्याचे चैन अंदाजे ८ ग्रॅम कि.अंदाजे ४०,०००/–रु.,बारीक काळे मनी व डायमंड लॉकेट कि.५०,०००/–रु.असा एकुण ९०,०००/– रु.चा मंगळसुत्र २) एक सोन्याचे लॉकेट ५.७१० ग्रॅम वजनाचे कि.२८,५००/– रु. ३)चांदीची २ जोड बिछीया २० ग्रॅम वजन कि.२,४००/– रु. ४) लिफाफामध्ये ठेवलेले रोख रक्कम अंदाजे १५,०००/– रु. असा एकुण १,३५,९००/– रु. चा माल पर्स कुर्सी वर ठेवला असतांना दिनांक १३.०२.२०२२ चे १४.०० वा. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सुनिल कुमार अम्रतलाल जैन वय ५९ वर्ष रा.किला रोड एन.एम.सी.वाटर टॅक जवळ, महाल नागपूर यांचे रिपोर्टवरून पोस्टे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक / सिमा बेद्रे मो नं ९८२२९७३१५४ करीत आहेत.

## रेती चोरी करणा–या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन कुही** – अंतर्गत मौजा सिल्ली ०२ किमी दक्षिण. दिनांक १७/०२/२२ चे सकाळी ०१/३० वा ते ०२/०० वा. दर. यातील फिर्यादी व चेकिंग अधिकारी पोलीस निरीक्षक चंद्रकांत मदने हे विभागीय गस्त दरम्यान समोरून येणारा अशोक लेलॅन्ड कंपनीचा एम.एच. ४० बी.एल. ५५११ चा ट्रक ला थांबविले असता आरोपीने आपल्या टिप्पर मध्ये विनापरवाना ५ ब्रास रेती अवैध्य वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीकडुन ०५ ब्रास रेती किंमती २५,०००/– रू. व टिप्परची किंमती अंदाजे २५,००,०००/– रू. असा एकुण २५,२५,०००/– रू. चा माल जप्त केला.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोलीस अंमलदार अमोल रामाजी झाडे, यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी नामे –महेश माधवराव पंचभाई, वय २५ वर्ष, रा. गांधी वार्ड, वलनी, ता. पवनी, जि. भंडारा यास अटक करण्यात आली असुन आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पो.स्टे. कुही हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक** :— अंतर्गत खिडसी, रामटेक पुर्व ७ किमी. दि १७/०२/२०२२ चे ०३.०० वा. ते ०३.३० वा. यातील मृतक नामे— सुरेंद्र जौहरी सुर्यवंशी कुरील वय ४४ व रा. बंधवा चौराह ता.जि.फतेपुर उ. प्र. ह.मु. कांद्री पेट्रोल पंप कन्हान हा ट्रक क्र. एमएच. ४० एके —५२८३ ने ट्रकमधिल कोयला तिरोडा येथे खाली करुन रामटेक कडे येत असतांना आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच. ४० एके — ५२८३ भरधाव वेगाने निष्काळजीपणाने व बेदरकारपणे चालवुन आपल्या ताब्यातील वाहन रामटेक ते तुमसर रोड वरील खिंडसी जवळ पलटी करुन स्वत: जखमी होवुन उपचारा दरम्यान स्वताच्या मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विरेंद्र जौहरी सुर्यवंशी कुरील वय ३३ वर्ष रा. बंधवा चौराह ता.जि.फतेपुर उत्तर प्रदेश ह.मु.कांद्री पेट्रोल पंप कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे चालकाविरूध्द कलम ३०४ (अ), २७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सिमा बेद्रे मो नं ९८२२९७३१५४ हे करीत आहे.

## अपघातात जखमी करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत आंबेडकर चौक काटोल २ किमी पश्चिम, दिनांक १७/२/२२ चे १६/१५ वा. ते १६/३० वा. दरम्यान, यातील फिर्यादी ची बहीन परवीना व वहीनी रूबीना यांना यातील नमुद आरोपी — टाटा नेक्सान च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून धडक मारली. ज्यामूळे दोघीही रोडवर पडल्याने जखमी झाल्या. वहीनी रूबीना हीच्या पायावरून कारचे चाक गेल्याने तीचे उजव्या पायाला जबर मार लागला, तसेच डोक्याला सूध्दा मार लागला आहे. त्यांचे उपचार कडु हॉस्पीटल मध्ये सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेख मिरज शेख ईस्त्रईल वय २२ वर्ष रा पेठबूधवार काटोल यांचे रिपोर्टवरून चालक नामे— सचिन कृष्णाजी कामडे रा श्रीराम नगर उदय नगर, चौक मानेवाडा रिंग रोड, नागपूर यांच्या चालका विरूध्द पो स्टे काटोल येथे कलम २७९,३३७,३३८, भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण मो नं ९५४५३६३१२१ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**